# डिजिटल एनेबलर्स

# MSME चे



## स्वावलंबन

*विका स्वप्नांना पंख.....*

इन्फो सिरीज
खंड-V

भारतीय लघु उद्योग विकास बँक

sidbi

# <u>प्रस्तावना</u>

प्रिय स्वावलंबी,

सिडबीकडून स्वावलंबन अभिवादन

व्हिजन 2.0 स्वीकारल्यावर सिडबीने, **संपर्क, संवाद, सुरक्षा आणि संप्रेषण** हे विषय घेऊन प्रचार आणि विकास यावरील आपल्या लक्ष-केंद्राची पुनर्रचना केली. सूक्ष्म आणि लघु उद्योगांना (एमएसई) स्थापना (सेट अप) आणि एक पाऊल पुढे जाणे (स्टेप अप) या दोन्हीत फायदा व्हावा यासाठी अभिनव समावेशक आणि परिणामकारक गुंतवणूक हे व्हिजन 2.0 चे उद्दिष्ट आहे, ज्यामुळे पुढे अधिक रोजगार निर्मिती होईल आणि देशात एकूण आर्थिक वाढ होईल. याशिवाय, उद्योजकता संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आणि युवकांमध्ये "रोजगार शोधणारे" कडून "रोजगार निर्मिती करणारे" असे परिवर्तन घडवण्यासाठी, ग्रामीण भागातून शहराकडे होणाऱ्या स्थलांतराला आळा घालण्यासाठी आणि पिरॅमिडच्या तळावर भर देत उपेक्षित/ दुर्लक्षित भागात/ विभागात तसेच एकूणच एमएसईमध्ये शाश्वत उपजिविकेला प्रोत्साहन देण्यासाठी पासून 2018 मध्ये बँकेने "मिशन स्वावलंबन" सुरु केले.

वर्तमान आणि संभाव्य स्वावलंबींना जोडण्याचा आणि त्यांचे स्वप्न असलेल्या उद्योजकता उपक्रमाच्या प्रवासात त्यांना मदत करण्याचा स्वालंबन माहिती शृंखला हा एक प्रयत्न आहे. हे उद्योजकतेचे मूलभूत तसेच अद्ययावत ज्ञान तुमच्या दाराशी घेऊन येते तसेच तुम्ही स्वतःच्या व इतरांच्या फायद्यासाठी वापरु शकाल अशी अलीकडील घटना/योजना/उपक्रम यांची अद्ययावत माहिती तुम्हाला देते.

वाचकांच्या अभिप्रायानुसार आम्ही विकसित होत जातो. कृपया आपले अभिप्राय/प्रश्न/सूचना आमच्याकडे पाठवा जेणेकरुन प्रत्येक खंडागणिक सुधारणा करता येईल. आम्हाला लिहिताना जेवढा आनंद मिळाला तेवढाच तुम्हाला वाचताना मिळेल अशी आम्हाला आशा आहे.

आपले वाचन आनंददायक राहो हीच इच्छा!

टीम स्वावलंबन, सिडबी

# <u>डिजिटल एनेबलर्सः संकल्पना</u>

आपल्या भोवतीचे जग वेगाने बदलत आहे. आपल्या जीवनकाळात, लॅपटॉपने डेस्कटॉप संगणकाची जागा घेतल्याचे, सीडीज आणि डिव्हीडीने युएसबी फ्लॅश ड्राइव्हसाठी मार्ग तयार केल्याचे आपण पाहिले आहे. खेड्यातील लोक एकत्र बसून राष्ट्रीय दूरचित्रवाहिनीवर ररामायणण बघायचे ते आता वैयक्तिक उपकरणांवर न थांबता वेब सिरिज बघण्यापर्यंतचा बदल झाला आहे. गुगल मॅप्सना धन्यवाद, आपल्या निर्धारित स्थली जाताना आजकाल कोणी वाट हरवत नाही.काही वर्षांपूर्वी न ऐकलेल्या आणि खरे तर अजिबात विचार केलेल्या होम-डिलिव्हरी, ई-कॉमर्स आणि ई-बुक्स या साऱ्या नव्या जगातील गोष्टी आहेत.

आपण सेवा कशा मिळवतो/घेतो ते बँक आपली नवीन उत्पादने कशी आणते यात बँकिंग जगतातील तंत्रज्ञामामुळे व्यापक बदल झाले आहेत. कॅश काऊंटरसमोरील दीर्घ रांगांमुळे एटीम आले. एटीएमच्या वर्चस्वाला आता डिजिटल वॉलेट, मोबाईल अप्लिकेशन्स आणि युपीआय आव्हान देत आहेत. काही बँका तर डेबिट कार्ड बंद करण्याचा विचार करीत आहेत.

कोअर बँकिंग सोल्युशन (सीबीएस)ने बँकेशी असलेले ग्राहकाचे नाते बदलून ते शाखेपासून स्वतंत्र करुन टाकले, ग्राहकांच्या गरजा नीट समजून त्यांना त्यानुसार सानुकूलित उपाय उपलब्ध करुन देण्यासाठी कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट (सीआरएम)ची मदत झाली. स्मार्ट फोन्सच्या माध्यमातून तंत्रज्ञान हाताशी आल्याने, ग्राहकांना बटनच्या एका क्लिकवर सेवा उपलब्ध होत असल्याची खात्री वित्त संस्था करुन घेत आहेत.

डिजिटल तंत्रज्ञान ग्राहकांना रिअल टाइम सेवा पुरवण्यापुरते मर्यादित नाही तर वेगाने वाढणाऱ्या माहिती-तंत्रज्ञानाच्या मूलभूत सुविधांच्या माध्यमातून पारंपरिक उद्योगांचे मॉडेल्स विस्कळीत होत असताना केवळ ग्राहकांना अधिक चांगली सेवाच मिळाली नाही तर पोर्टेबिलिटी, वापरातील सुलभता, ग्राहक गुंतवणूक, स्मार्ट विपणन इत्यादीत देखील वाढ झाली आहे. हे युग पूर्णतः डिजिटायझेशनचे आहे जेथे ग्राहकाला प्रत्येक सेवा मानवी हस्तक्षेप कमी करत डिजिटली मिळते आणि वाढता वेग, पारदर्शकता, गुणवत्ता, उत्तरदायित्व, जबाबदारी आणि सुलभता प्रदान करते.

आमची सध्याच्या माहिती मालिकेची आवृत्ती अशा डिजिटल एनेबलर्सद्दल आहे ज्यांनी अनेक कायम उद्भवणाऱ्या समस्यांचे डिजिटल समाधान प्रदान केले व ते MSMEच्या जीवनात परिवर्तन घडविण्याच्या तयारीत आहेत.

# MSME समोरील आव्हाने

## माहिती विषमता

उद्योग विकास चक्रात कल्पना ते स्थापना ते वरच्या पायऱ्या चढणे ते बाहेर पडणे आणी पुन्हा विस्तारित किंवा उफ़योन्मुख व्यवसायात पाय ठेवणे यासाठी उद्योजकांना योजना, कार्यक्रम आणि उपक्रमांची विश्वासार्ह माहिती मिळवणे खूप महत्वाचे आहे. इच्छुक आणि विद्यमान दोन्ही MSME असे विश्वासार्ह चॅनेल / संस्था शोधतात. प्रवेश किंवा संपर्कशक्यता सुलभ करण्यासाठी अतिरिक्त माहिती गाळून घेणे महत्त्वाचे आहे. फलदायी उपक्रमासाठी योग्य, पुरेशी आणि अचूक माहिती अत्यावश्यक आहे.

## सहज कर्ज

देशाच्या सकल घरेलु उतपादनामध्ये MSMEच्या योगदानाची प्रशंसा केली जाते. तरीही, MSME क्षेत्रामध्ये पतपुरवठ्याचा प्रवाह दीर्घकाळापासून कमी प्रमाणात राहिला आहे. एकूणच बँकिंग क्षेत्रातील MSMEचे अपराध प्रमाण कमी असूनही, बँकांनी सामान्यतः MSMEना कर्ज देण्यासाठी धोकादायक क्षेत्र समजले आहे. याशिवाय पतपुरवठादारांनी स्विकारलेल्या पारंपारिक प्रक्रियेमुळे MSMEना सहज कर्ज मिळवणे कठीण आहे. उद्योजकांना आपल्या सोयीनुसार अर्ज करुन सहज-सोपे आणि जलद, विना-अडथळा कर्ज मिळण्यास अर्ज करता यावा आणि ते मिळावे यासाठी नेहमीच मागणी होती.

## प्राप्य वित्तपुरवठाः

मध्यम आणि मोठ्या उद्योगांना माल आणि सेवा पुरवठादार म्हणून MSME महत्त्वाची भूमिका पार पाडतात. मात्र, मध्यम आणि मोठ्या उद्योगांकडे असलेल्या सौदेबाजीच्या जास्त शक्तीमुळे MSMEच्या प्राप्याला उशीर होतो. यामुळे, उशीरा पैसे मिळण्याच्या समस्येने, विशेषतः कार्पोरेट खरेदीदारांवरील अवलंबित्व तसेच योग्य संस्थामक माध्यमातून उशीरा मिळणाऱ्या देयांची समस्या मांडण्याची क्षमता नसल्याने हे क्षेत्र अधू झाले आहे. सध्याच्या मालमत्तेचा मुख्य घटक असलेले व्यापार प्राप्याचे जलद रुपांतर हे रोकड रुपांतर सुलभतेच्या उपलब्धतेसाठी MSMEसाठी महत्त्वाचे आहे.

## हॅंडहोल्डिंग सपोर्टः

गंभीर व्यवसाय कौशल्य किंवा जाण असूनही मुख्यतः सूक्ष्म / नवीन उद्योजकांसमोर एक मोठे आव्हान आहे ते असे की अनेकदा पत उपलब्धता, वैधानिक अनुपालन आणि बाजारपेठेतील पोहोच या मूलभूत ज्ञानाच्या बाबतीत मोठ्या उद्योगांच्या तुलनेत ते मागे पडतात. यात अनुदानाचा लाभ घेण्यासाठी अर्ज भरणे / प्रकल्प अहवाल तयार करणे / ताळेबंद तयार करणे, परतावा भरणे इत्यादी अगदी साध्या मुद्द्यांचा समावेश आहे. उद्योजक शेवटी व्यवसाय जगाच्या चक्रव्यूहामध्ये हरवतात ज्यामुळे त्यांची पतपात्रता आणि व्यवसाय करण्याची क्षमता यांचा पायाच कमकुवत होतो आणि म्हणूनच त्यांचा व्यवसाय अकाली बंद पडतो.

## बाजारपेठ


प्रातिनिधिकपणे, एक MSME एका लहान भौगोलिक परिसरात किंवा ग्राहकांच्या लहान संचाच्या आधारावर काम करते. नवीन बाजारपेठ शोधण्याची अक्षमता हे अपयश आणि व्यवसाय थंड पडण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. कमी ग्राहक-आधारामुळे त्यांचा भाग घेण्याचा धोका आणि बाजारातील चढ-उतारांची असुरक्षितता वाढतो.

## संपार्श्विक सुरक्षिततेचा अभावः

MSMEला प्रारंभिक टप्प्यात तसेच वाढीच्या टप्प्यात बँकेकडून निधीची गरज असते. संपार्श्चिक नसलेले इच्छुक आणि संपार्श्विकाच्या शोधात असलेले पतपुरवठादार यांचा मेळ जुळत नाही. सीजीटीएमएसई आणि एनसीजीटीसी सारख्या हमी संस्था योमन सेवा देत असताना, MSME आपली पात्रता समजून घेण्यासाठी संघर्ष करीत आहेत.

# डिजिटल एनेबलर्सच्या माध्यमातून उपाय

विविध चॅनल्सच्या माध्यमातून येत असलेल्या MSME समोरील आव्हानांना डिजिटल एनेबलर्स प्रभावी उपाययोजना उपलब्ध करुन देतात, त्या चॅनल्सचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे




## आर्थिक

**A) पीएसबी लोन:**

फिनटेक्स आर्थिक क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणत आहेत. उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करत असल्याने कर्ज वितरणाच्या प्रक्रियेला वेग मिळाला आहे तसेच कर्ज देण्याशी संबंधित जोखीमाही कमी झाल्या आहेत. देशातील आघाडीच्या बँकांच्या संघाच्या सहकार्याने सिडबीने पीएसबी कर्ज 59 मिनिटात हे व्यासपीठ सुरु केले होते. ही एक बाजारपेठेची जागा आहे जिथे MSME व्यवसाय कर्ज (मुदत कर्ज/ कार्यकारी भांडवल कर्ज) आणि किरकोळ कर्ज (वैयक्तिक कर्ज, गृह कर्ज आणि ऑटो कर्ज) यांना 59 मिनिटांपेक्षा कमी वेळात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँका आणि एनबीएफसी यांद्वारे तत्त्वतः मंजुरी मिळते.

या व्यासपीठाने तत्त्वतः कर्ज प्रक्रिया कार्यवाही पूर्ण होण्यास लागणारा वेळ कित्येक दिवसांवरुन 59 मिनिटांपर्यंत कमी करुन नवीन मानदंड स्थापित केला आहे. तत्त्वतः मान्यतेचे पत्र मिळाल्यावर जवळपास 7-10 कामकाजी दिवसात कर्ज मंजूर/वितरित होणे अपेक्षित आहे.

हे युझर-फ्रेंडली पोर्टल देते संपर्करहित प्रवास जिथे कर्जदाराला तत्त्वतः मान्यतेसाठी बँक शाखेला भेट द्यावी लागत नाही. उत्पन्न कर परतावा, जीएसटी डेटा, बँक विवरणे इत्यादी विविध स्त्रोतांमधील डेटा पॉइंट्सचे विश्लेषण करण्यासाठी हे व्यासपीठ प्रगत अल्गोरिदम वापरतो.

## जलद आणि कार्यक्षम पतपुरवठ्यासाठी पीएसबी कर्जाची यंत्रणा

किरकोळ कर्जदार ❯ नोंदणी आणि ऑनलाईन अर्ज करतात ❯

### ग्राहक डेटा भरा

- ITR
- बँक विवरणे
- डेटा फिल अप

### डेटा आणि बँकेकडून चेक्स

experian

ग्राहक ब्युरो चेक्स

### ऑटो स्कोअर आणि चेक्स

- ऑटो स्कोअरिंग
- प्रॉडक्ट-पॉलिसी ऑटो चेक
- ऑटो पात्रता गणना
- ऑटो मान्यता


❯ ग्राहकाला पतपुरवठादार निवडण्याचा पर्याय मिळतो

रियल टाइम तत्वत: मान्यता पत्र

## मुख्य वैशिष्ट्ये आणि लाभ

- कधीही, कुठेही अर्ज करा
- समजण्यात सुलभ
- रियल टाइम प्रक्रिया
- ऑनलाईन तत्वत: मान्यता
- किमान दस्तऐवजीकरण
- तंत्रज्ञान आधारित पात्रता तपासणी
- मानवी पूर्वग्रह नाही
- पारदर्शक अटी


sidbi




## <u>इतर लाभ</u>

| | |
|---|---|
| **तत्त्वतः मान्यता** | • रु.10 लाखांपर्यंत मुद्रा लोन<br>• रु 1लाख ते रु 5 कोटी MSME मुदत कर्ज आणि कार्यकारी भांडवल खर्च |
| **सोय** | •बँकेला भेट न देता एक बटन क्लिक करुन MSME कर्जासाठी अर्ज करु शकते |
| **जलद प्रक्रिया** | •एका साध्या प्रक्रियेद्वारे अर्जदाराला त्याच्या कर्जाच्या अर्जाला 59 मिनिटांपेक्षा कमी वेळेत तत्त्वतः मान्यता मिळू शकते |
| **सीजीटीएमएसई व्याप्ती** | •पात्र अर्जदारांना संपार्श्विक मुक्त कर्ज मिळण्याचा पर्याय पोर्टल प्रदान करते |
| **थेट खात्यात पैसे जमा** | •आपल्या बँक खात्यात कर्ज वितरित करुन घेण्याची सुविधा कर्जदाराला मिळते |
| **लवचिक कालावधी** | •परवडणाऱ्या व्याजदरासह |
| **पीएसबी एकत्रिकरण** | •25 पेक्षा जास्त सार्वजनिक आणि खाजगी बँका आणि एनबीएफसी या व्यासपीठावर आहेत. |

# पोर्टल कसे वापरयाचे




## B) BHIM-युपीआय

देशातील एकूणच MSME पतपुरवठ्याला चालना देण्यासाठी, बँकांनी कर्जाचा अर्ज भरण्याच्या टप्प्यापासून MSME कडून प्रारंभिक माहिती/ डेटा पॉइंट्स मिळवण्यापासून ते कर्जाची प्रक्रिया, कर्ज संनियंत्रण, मोठ्या ऑर्डरच्या वेळी, आपत्तीच्या इत्यादींच्या वेळी जोखमीचे मापन आणि त्वरित पडताळणी या सर्व प्रकारच्या क्रेडिट ॲक्सेस व्हॅल्यू चेनचे डिजिटलायझेशन सुरू केले आहे. वेब किंवा मोबाईल फोन वापरण्यासाठी MSMEने तयार राहयला हवे. डिजिटायझेशनमुळे होनार्या अमूलाग्र बदलाने किफायतशीर अंडररायटिंग, जलद आणि चांगले कर्ज निर्णय आणि परतावा कालावधीत चांगले अनुपालन या गोष्टी आल्या आहेत. याशिवाय, ज्या MSME पारदर्शक डिजिटल व्यवहार ठेवतील त्यांना भविष्यात फायदा मिळेल.

*डिजिटल व्हा आणि सक्षमतेचे विलक्षण कौशल्य मिळवा*

## किरकोळ पेमेंट प्रणाली

अनेक पेमेंट प्रणालींमध्ये, नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रांस्फर (एनईएफटी), इमिजिएट पेमेंट सर्व्हिस (आयएमपीएस) आणि रियल-टाइम ग्रॉस सेटलमेंट (आरटीजीएस) या वापरकर्त्यांच्या निधी हस्तांतरण गरजा पूर्ण करतात. कोणत्याही वेळी डिजिटल पेमेंट करता येण्याची सुनिश्चिती करण्यासाठी एनईएफटी 24x7 कार्यान्वित ठेवले आहे. आयएमपीएसही 24x7 त्वरित निधी हस्तांतरण प्रणाली आहे तर आरटीजीस, आंतरबँक व्यवहारांव्यतिरिक्त रु. 200,000 पेक्षा जास्त मूल्याच्या व्यवहार प्रक्रियेसाठी आहे.

युनिफाईड पेमेंट इंटरफेस (युपीआय) आल्याने मोबाईल पेमेंट प्रणालीत क्रांती आली आहे. देशात कधीही, कुठेही आणि कसेही बिल पेमेंट करण्याची सुविधा भारत बिल पेमेंट सिस्टिम (बीबीपीएस) प्रदान करते आणि सर्व प्रकारचे इलेक्ट्रॉनिक पेमेंट्स या माध्यमातून केले जाऊ शकतात.

भारत इंटरफेस फॉर मनी (BHIM) हे ॲप तुम्हाला युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (युपीआय) वापरुन सोपे, सहज आणि त्वरित पेमेंट व्यवहार करु देते. तुम्ही त्वरित बँक ते बँक पेमेंट्स करु शकता आणि फक्त मोबाईल नंबर किंवा व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (युपीआय आयडी) वापरुन पैसे प्राप्त करु शकता.




*प्रतिमा स्त्रोत:* https://www.npci.org.in/

## मुख्य वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| **पैसे पाठवा** | •व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (युपीआय आयडी), खाते क्रमांक टाकून आणि क्युआर स्कॅन करुन पैसे पाठवा. |
| **पैसे प्राप्त करा** | •व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (युपीआय आयडी) टाकून पैसे प्राप्त करा. शिवाय BHIM ॲपच्या माध्यमातूनही मोबाईल नंबर वापरुन पैसे हस्तातंरित केले जाऊ शकतात. |
| **स्कॅन ॲंड पे** | •स्कॅन ॲंड पे च्या माध्यमातून क्युआर कोड स्कॅन करु पैसे भरा किंवा तुम्हाला पेमेंट करणे इतरांना सहज व्हावे म्हणून तुमचा तयार करु शकता. |
| **व्यवहार** | •तुमचा व्यवहार इतिहास पहा आणि प्रलंबित युपीआय कलेक्ट रिक्वेसटही (असल्यास) पहा. |
| **बॅंक खाते** | •तुमच्या BHIM ॲपला जोडलेल्या विविध बॅंकांच्या खात्यांतून व्यवहार करा. तुम्ही तुमचा युपीआय पिन तयार / बदलू शकता किंवा खात्यात किती रक्कम पाहू शकता. |
| **भाषा** | •BHIM 13 भाषांमध्ये उपलब्ध आहे, त्या आहेत हिंदी, इंग्रजी, तामिळ, तेलुगु, मल्याळम, बंगाली, उडिया, कानडी, गुजराती, मराठी, आसामी आणि बंगाली. |
| **वापरकर्त्याला ब्लॉक करा** | •बेकायदेशीर स्त्रोतांमधून कलेक्ट रिक्वेस्ट पाठवणाऱ्यांना तुम्ही ब्लॉक/ स्पॅम करु शकता. |
| **गोपनीयता** | •प्रोफाईलमध्ये सेकंडरी युपीआय आयडी (बंद केलेल्या युपीआय आयडीसाठी क्युआर ही बंद होतो) तयार केला असेल तर वापरकर्त्याला mobilenumber@upi बंद आणि सुरु करता येते. |
| **पेमेंट करण्याची आठवण** | •तुमच्या सोयीनुसार पेमेंटचे वेळापत्रक करा. |
| **स्प्लिट बिल** | •एक बटन क्लिक करुन अनेक युपीआय वापरकर्त्यांमध्ये बिल विभाजन. |

# BHIM युपीआय ॲप कसे वापरायचे



***Image source:*** *https://www.npci.org.in/*

## BHIM युपीआय ॲपच्या माध्यमातून विनाअडथळा व्यवहाराचा आनंद घ्यायचा असेल तर पुढील पायऱ्यांचे पालन करायला हवे:

गुगल प्ले स्टोआर/ ॲपल स्टोअरमधून BHIM ॲप डाऊनलोड करुन इन्स्टॉल करा

तुमच्या प्राधान्याची भाषा निवडा

तुमच्या संबंधित बँकेत नोंदणी केलेल्या मोबाईल नंबरचे सीम कार्ड निवडा

ॲपमध्ये जाण्यासाठी अप्लिकेशन पासकोड सेट करा

बँक अकाऊंट पर्याय वापरुन तुमचे बँक खाते जोडून घ्या

डेबिट कार्डचे शेवटचे 6 अंक आणि डेबिट कार्डची मुदत एक्सपायरी डेट देऊन युपीआय पिन तयार करा

सेंड वर क्लिक करा आणि युपीआय आयडी किंवा आधार नंबर द्या. ज्या व्यक्तीला पैसे पाठवायचे आहेत त्याचा क्युआरही तुम्ही स्कॅन ॲंड पे करु शकता.

व्यवहार प्रमाणित करण्यासाठी तुम्ही आधी सेट केलेला युपीआय पिन टाका

व्यवहाराची स्थिती पाहण्यासाठी व्यवहार इतिहास तपासून पहा.

## C) RXIL

रिझर्व बँकेने 2014 मध्ये एका सुरक्षित आणि डिजिटल व्यासपीठावर MSMEसाठी व्यापार प्राप्तीसाठी वित्तपुरवठा करणार्या तंत्रज्ञानाची योजना 'टीआरइडीएसस ही संकल्पना मांडली. 'टीआरइडीएससवरील इन्व्हॉइस डिस्काउंटिंगमध्ये तीन सहभागी असतात, MSME पुरवठादार, कार्पोरेट खरेदीदार आणि वित्त पुरवठादार. डिस्काउंटिंगच्या पद्धतीनुसार खरेदीदार किंवा पुरवठादार इनव्हॉइस अपलोड करतात आणि दुसरा पक्ष त्याला मान्यता देतो. एकदा इनव्हॉइसला मान्यता मिळाली की व्यासपीठावरील वित्त पुरवठादार इनव्हॉइसवर बोली लावायला सुरुवात करतात. व्यासपीठावरील बोली पुरवठादाराने स्विकारली की सूटीची रक्कम निर्दिष्ट वेळेत त्याच्या खात्यात जमा केली जाते. ही प्राप्यता कार्पोरेट आणि सरकारी विभाग आणि सार्वानिक क्षेत्रातील उपक्रम (पीएसयु) यांसह इतर खरेदीदारांकडून असू शकते. देशात तीन 'टीआरइडीएसस व्यासपीठे कार्यरत आहेत. अशांपैकी एक व्यासपीठ आहे आरएक्सआयएल आहे. सिडबी-एनएसई संयुक्त उपक्रम, रिसिव्हेबल एक्सचेंज ऑफ इंडिया (आरएक्सआयएल), भारतीय रिझर्व बँकेने (आरबीआय) घालून दिलेल्या 'टीआरइडीएसस नियमवलीनुसार 'टीआरइडीएसस डिसकाउंटिंग सिस्टिम चालवते. टीआरईडीएस हे अनेक वित्त पुरवठादारांद्वारे MSMEच्या व्यापार स्वीकारण्यायोग्य वित्तपुरवठा सुलभ करण्यासाठीचा इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म आहे.

**TReDS व्यासपीठ**

| **MSME पुरवठादार** | **खरेदीदार** | **वित्त पुरवठादार** |
|---|---|---|
| खरेदीदाराला वस्तू/सेवा पुरवतात | अ) कार्पोरेट्स<br>ब) सरकारी विभाग<br>क) पीएसयु इ. | अ) बँक्स<br>ब) एनबीएफसी |

### TReDSचा MSMEना कसा फायदा झाला

**वेळेत पतपुरवठा**
- सर्व भागधारकांना (खरेदीदार, विक्रेते आणि वित्तपुरवठादार) तसेच सामान्य ऑनलाइन व्यासपीठावर प्राप्त करण्यायोग्य वित्तपुरवठ्याची संपूर्ण प्रक्रिया आणणे हे सुनिश्चित करते की MSMEला त्याच्या प्राप्तकर्त्यांवरील देय रक्कम वेळेवर मिळतील.

**व्याजदरात घट**
- वित्त पुरवठादार मोठ्या कॉर्पोरेटचे एक्सपोजर घेत असल्याने, यामुळे डिफॉल्टचा धोका कमी होतो आणि म्हणून व्याजदरामध्ये घट होते.


**संपार्श्विकाची गरज नाही**
- TReDS व्यासपीठाचे एक वैशिष्ट्य म्हणजे विक्रेता MSMEला कर्जासाठी कोणतेही तारण किंवा संपार्श्विक देण्याची गरज नाही

**कार्यकारी भांडवल मर्यादेवर काहीही परिणाम नाही**

TReDS अंतर्गत मिळालेले निधी "ऑफ बॅलन्स शीट एक्सपोझर"चा भाग असल्याने त्याचा MSMEच्या कार्यकारी भांडवल मर्यादेवर कोणताही विपरित परिणाम होत नाही.

**MSMEला पर्याय नाही**
- पेमेंटला उशीर झाल्यास किंवा पेमेंट न केल्यास MSMEवर परिणाम होत नाही. वित्त पुरवठादाराने MSMEकडून प्राप्य विकत घेतले आहे, आवश्यक पेमेंट केले आहे आणि पेमेंटला उशीरा किंवा पेमेंट न करणे याची जोखीम MSMEकडून स्वतःकडे घेतली आहे आणि जर कार्पोरेटने पेमेंट केले नाही तर ती वित्त पुरवठादार आणि कार्पोरेट यांच्यातील बाब आहे.

# <u>पोर्टलचा वापर कसा करायचा</u>




***फॅक्टोरिंग युनिट (एफयु) हे एक प्रमाणित नामकरण आहे जे "टीआरइडीएस"मध्ये इनव्हॉइस किंवा विनिमय बिलांसाठी वापरले जाते. प्रत्येक एफयू कॉर्पोरेट किंवा इतर खरेदीदारांचे पुष्टीकरण असलेले बंधन प्रतिनिधित्व करते, ज्यात सरकारी विभाग आणि पीएसयु समाविष्ट असतात. तटीआरइडीएससमध्ये,* MSME *विक्रेता किंवा खरेदीदार एफयु तयार करु शकतात. जर* MSME *विक्रेत्याने ते तयार केले तर त्याला फॅक्टोरिंग म्हणतात, तेच जर कार्पोरेटने किंवा इतर खरेदीदारांनी तयार केले तर त्याला रिव्हर्स फॅक्टोरिंग म्हणतात.*

# गैर-आर्थिक

**A) उद्यमीमित्र आणि स्टॅंड अप इंडिया पोर्टल:** स्टॅंड अप इंडिया पोर्टल आणि उद्यमीमित्र पोर्टल (www.standupmitra.in & www.udyamimitra.in) ही दोन जुळी पोर्टल्स, पर्यावरणातील सर्व सहभागीदारांना ज्यात शेड्युल्ड कमर्शियल बॅंक्स, फिनटेक, एनबीएफसी, एसएफबी, हॅंडहोल्डिंग एजंसीज (पीएमकेके, पीएमकेव्हीवाय, आरएसइटीआय, आरयुडीएसइटीआय), सीएससी, औद्योगिक संघटना, नाबार्ड (जसे एसयुसीसी) आणि सिडबी (जसे एसयुसीसी) इ. चा समावेश आहे, यांना एकत्र आणतात.

**उद्यमीमित्र पोर्टल** (जे स्टॅंड अप इंडिया पोर्टलची माहिती-तंत्रज्ञान पायाभूत सुविधा वापरते आहे) हे एक सक्षम व्यासपीठ आहे, हॅंड होल्डिंग आधार, अप्लिकेशन ट्रॅकिंग, भागधारकांसह एकाधिक इंटरफेसद्वारे होस्ट क्रेडिट प्लस सर्व्हिसेससाठी संपूर्ण उपाययोजना प्रदान करण्याचे उद्दीष्ट आहे. पतपुरवठादार याला जिथे निवडक अर्ज बिझनेस लीड्स (मार्गदर्शक माहिती) म्हणून उपलब्ध आहेत असे लीड व्यासपीठ म्हणून वापरतात. इच्छुक/ कर्ज घेऊ पाहणारे हे विश्वासार्ह माहिती शोधण्यासाठी, जिज्ञासा असलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी, कसे विकसित व्हायचे/ विश्वननीय कसे राहतात वगैरे शोधण्यासाठी याचा वापर करीत आहेत. पुढीलसाठी हे पोर्टल सुलभीकरण करणारे म्हणून काम करीत आहे:

**बॅंकेबिलिटी किट**
विश्वसनीय राहण्यासाठी आणि आर्थिक शिस्त राखण्यासाठी अर्जदाराला मार्गदर्शक साधन म्हणून हे पोर्टल विकसित आणि अपलोड करण्यात आले होते.

**समृद्धी चॅटबोट**
वारंवार विचारले जाणाऱ्या प्रश्नांसाठी (एफएक्यु) आभासी सहय्यक

**प्रकल्प प्रोफाईल्स**
अर्जदारांना त्यांचे व्यवसाय ओळखण्यास आणि निवडण्यास मार्गदर्शन करण्यासाठी 325+ प्रकल्प प्रोफाइल पोर्टलवर उपलब्ध केल्या आहेत.

**संदर्भ सामग्री**
MSMEना सहज संदर्भ उपलब्ध व्हावा म्हणून ऑडियो-व्हिज्युअल (AV) आणि स्वालंबन माहिती शृंखला (3 पुस्तके) पोर्टलवर उपलब्ध करुन दिले आहेत.

**परपुरवठा संपर्क**
1.3 लाखपेक्षा जास्त बॅंक शाखांसह जवळपास 140 पतपुरवठादार, 7000+ सक्रिय हॅंडहोल्डिंग एजंसीज (प्रमाणित पतपुरवठा समुपदेशक-सीसीसी/सीसीआय यासह) पोर्टलवर चिन्हांकित आहेत.

**अद्ययावत ई-साधने**
विविध अद्ययावत ई-साधने जसे आभासी पर्यावरणात हॅंडहोल्डिंग (एचएव्हीई), क्रेडिट ब्युरो स्कोअर, ई-केवायसी, ई-सूचना, CGTMSE/NCGTC साठी रुल इंजिन, ॲक्सेस टूल किट इत्यादीसह हे पोर्टल सक्षम आहे.

---

# मुख्य विशिष्ट्ये

**संपर्क-संबंध स्थापित करणारे व्यासपीठ**

- कर्ज घेणारे MSME, हँडहोल्डिंग एजंसी म्हणूनही पतपुरवठादार, यांचे संपर्क-संबंध स्थापित करणारे एक अनोखे व्यासपीठ उपलब्ध करुन देते. विविध MSME कर्ज अर्ज स्विकारण्याची क्षमता पोर्टलने डिझाईन केली आहे. वर्तमानात 10 कोटींपर्यंतचे कर्ज घेतले जाऊ शकते. विविध सहभागीदार असलेली आधार प्रणाली विकसित करुन महत्त्वाचे इंटरफेस लेयर होण्याचे पोर्टलचे उद्दिष्ट आहे.

**सगळ्यांना सर्वसमावेशक प्रवेश**

- हे तीन वैशिष्ट्ये असलेल्या जसे (i) हँडहोल्डिंग आधार मिळवा; (ii) प्राधन्य असलेल्या बँका निवडून कर्जासाठी अर्ज करा; (iii) जलद कर्ज प्रक्रिया करा; यासह आर्थिक (1.3 लाख शाखा) आणि गैर-आर्थिक सेवा (17000+ हँडहोल्डिंग एजंसीज) दोन्हीसाठी प्रवेश उपलब्ध करुन देते.

**गैर-आर्थिक सेवांसाठी प्रवेश**


- पोर्टलने विविध क्षेत्रात तज्ज्ञ असलेल्या जसे आर्थिक प्रशिक्षण, कौशल्य विकास, प्रकल्प अहवाल तयार करणे, अर्ज भरुन सादर करणे, वर्क शेड आणि विविध राज्य/केंद्रिय संघटना/महामंडळांद्वारे संचालित मार्जिन मनी/अनुदान आधार उपलब्ध करुन देणाऱ्या हँडहोल्डिंग एजंसीज चिन्हांकित केल्या आहेत. संपूर्ण उद्योग विकास चक्रात उद्योजकांची गरज पूर्ण करनारे पोर्टल म्हणून विकसित व्हावे हे उद्दिष्ट आहे.

**वित्त उपलब्धता**


- सध्या, जवळपास 1.3 लाख शाखा (सार्वजनिक क्षेत्रातील बँक, खाजगी क्षेत्रातील बँका, परदेशी बँका, एनबीएफसी, फिनटेक, स्मॉल फायनान्स बँका) पोर्टलवर चिन्हांकित आहेत. मानवी कामाच्या जागी हे पोर्टल इलेक्ट्रॉनिक व्यासपीठ देते जिथे सगळ्या बँकांमध्ये मंजुरीपूर्व प्रक्रिया सोप्या पद्धतीने पद्धतशीर प्रमाणित होईल. पोर्टलवर रमार्केट प्लेसस आहे जिथे कर्ज वितरण यंत्रणेत बँक परस्परांमध्ये स्पर्धा करतील.

# उद्यमीमित्र पोर्टलवर अर्जदार प्रवास


## संकेतस्थळ प्रवास




## डॅशबोर्ड




## लोन अर्ज प्रक्रिया




sidbi

# स्टँड अप इंडिया पोर्टल

अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि महिला उद्योजकांनी ग्रीनफिल्ड उद्योग स्थापन करावे म्हणून प्रोत्साहन)

एससी, एसटी आणि महिला वर्गातील उद्योजकांना उद्योग प्रचाराला आधार देण्यासाठि 3 स्तंभांवर आधारित डिजिटल व्यासपीठ स्टँड अप इंडिया पोर्टल (www.standupmitra.in):

(i) हँडहोल्डिंग आधार
(ii) वित्तपुरवठ्यावर माहिती उपलब्ध करुन देणे
(iii) पतपुरवठा हमी

इंटरॅक्टिव्ह पोर्टल हाताळून संभाव्य उद्योजक आधारासाठी किंवा कर्जासाठी नोंदणी करु शकतात.हे पोर्टल केंद्र आणि राज्यातील एससी/एसटी महामंडळे, एससी/एसटीच्या औद्योगिक संघटना आणि/ किंवा महिला उद्योजक यासाठीच्या महत्त्वाच्या लिंक्स उपलब्ध करुन देते. स्टँड अप इंडिया पोर्टलची काही मुख्य वैशिष्ट्ये आणि देत असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे:







B) **सीजीटीएमएसई:** पहिल्या पिढीच्या उद्योजकांचे स्वतःचे सूक्ष्म आणि लघु उद्योगाचे युनिट स्थापन करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय (MSME), भारत सरकार यांनी पतपुअरवथा हमी योजना (क्रेडिट गॅरंटी स्कीम (सीजीएस)) सुरु केली आहे जेणेकरुन कर्ज वितरण संस्था सक्षम व्हावी आणि MSME क्षेत्रात कर्ज प्रवाहाचे सुलभीकरण व्हावे. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी भारत सरकार आणि सिडबीने सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट (सीजीटीएमएसई) स्थापन केला आहे

## क्रेडिट गॅरंटी:

पत हमी (क्रेडिट गॅरंटी) म्हणजे एखाद्या संस्थेद्वारे संपार्श्विक / तृतीय पक्षाच्या हमीशिवाय क्रेडिट सुविधेचा आधार आहे. जी संस्था पत हमी देते ती बहुतांश कर्ज रकमेला कव्हरही देते. सीजीटीएमएसईद्वारे पत हमी अंतर्गत नवीन आणि वर्तमान दोन्ही MSME कव्हरसाठी पात्र आहेत.

## CGTMSEचा लाभ कसा घ्यायचा

कर्ज देणाऱ्या पात्र संस्थाना ट्रस्टची कर्ज देणारी सदस्य संस्था (एमएलआय) व्हायचे असेल तर सीजीटीएमएसई सोबत "एक वेळेचा" करार करावा लागतो.

कोणत्याही पात्र कर्जदाराला मंजूर झालेल्या पात्र कर्ज सुविधेसंदर्भात गॅरेंटी कव्हरसाठी मग कर्ज देणारी सदस्य संस्था (एमएलआय) अर्ज करु शकते.

कर्ज देणारी सदस्य संस्था (एमएलआय) गॅरेंटी क्व्हरसाठी मंजूर झालेल्या कर्ज प्रस्तावांसंदर्भात एप्रिल-जून-जुलै-सप्टेंबर, ऑक्टोबर-डिसेंबर आणि जानेवारी-मार्च या तिमाहित पुढील तिमाहीची मुदत संपण्यापूर्वी अर्ज करु शकते.

## मुख्य वैशिष्ट्ये

**पात्र पतपुरवठादार संस्था**

- शेड्युल्ड कमर्शियल बँक्स (सार्वजनिक क्षेतारील बँक्स/खाजगी क्षेत्रातील बँक्स/ परदेशी बँक्स) आणि निवडक प्रादेशिक ग्रामीण बँक्स (ज्यांचे नाबार्डद्वारे "शाश्वत व्यवहार्य" असे वर्गीकरण करण्यात आले आहे)

**पात्र कर्ज सुविधा**

- मुदत कर्ज/ किंवा कार्यकारी भांडवल सुविधा दोन्ही रु.100 लाखांपर्यंत प्रति कर्जादार युनिट, कोणत्याही संपार्श्विक सुरक्षिततेशिवाय दिलेले आणि / किंवा तृतीय पक्ष हमी, नवीन किंवा सध्या असलेल्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी.

**गॅरंटी कव्हर**

- कर्ज सुविधेत मंजूर रकमेच्या 50% / 75% / 80% आणि 85% पर्यंत

**हायब्रिड सुरक्षितता**

- संपार्श्विक सुरक्षिततेत समाविष्ट नसलेल्या कर्ज सुविधा भागासाठी गॅरंटी कव्हर देणारे "हायब्रिड सुरक्षितता" हे नवीन उत्पादन सीजीटीएमएसईने आणले आहे. अंशतः संपार्श्विक सुरक्षितता मॉडेलमध्ये एमएलआयला कर्ज सुविधेच्या एका भागासाठी संपार्श्विक सुरक्षितता मिळवण्याची परवानगी असेल तर उर्वरित कर्ज सुविधेच्या भागासाठी कमाल 200 लाखांपर्यंत सीजीटीएमएसई अंतर्गत कव्हर केले जाऊ शकते.

**कालावधी**

- गॅरंटी फी भरण्याचय ई-तारखेपासून हमीची सुरुवात होईल आणि मुदत कर्ज / संमिश्र कर्जाच्या मुदत पतपुरवठ्याच्या मान्य कालावधीपर्यंत असेल आणि जिथे कर्जदारांना फक्त कार्यशील भांडवल सुविधा दिली आहे तिथे 5 वर्षांच्या कालावधीसाठी असेल किंवा याबाबतीत गॅरंटी ट्रस्टने निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी असेल.

**वार्षीक गॅरंटी शुल्क**

- पतपुरवठा सुविधेसाठीः
  - रु.5 लाखांपर्यंतः 1.00 + जोखीम प्रिमियम*
  - रु.5 लाखांपेक्षा जास्त आणि रु. 50 लाखांपर्यंतः 1.35 + जोखीम प्रिमियम (महिला, सूक्ष्म उद्योग आणि एनईआर युनिट्स) आणि 1.50 + जोखीम प्रिमियम इतरांसाठी)
  - 50 लाखांच्या वर आणि 200 लाखांपर्यंत : 1.80 + जोखीम प्रिमियम


**सध्या उद्यमीमित्र पोर्टल, स्टँड अप मित्र पोर्टल आणि पीएसबी 59 मिनिट्स पोर्टल पात्रता तपासणी उपलब्ध करुन देते**

# बाजारपेठ संपर्क

## A) ई- कॉमर्स व्यासपीठ

भारतातील ई-कॉमर्स व्यवसायाच्या उदयामुळे आता MSMEसाठी अंतहीन संधी निर्माण झाल्या आहेत. शिवाय, जीएसटी चौकट अस्तित्त्वात आल्याने, MSMEसाठीचे भौगोलिक अडथळे संपले आहेत. ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट या पोर्टलवर अनेक MSME आपली नोंदणी करून देशाच्या विविध भागात पुरवठा करतात.

कोणत्याही ई-कॉमर्स स्थळावर विक्रीची प्रक्रिया




## B) सरकारी ई-बाजारपेठ (गव्हर्नमेंट ई- मार्केटप्लेस -जीईएम)

सरकारी खरेदी MSMEना महसूल वाढविण्यासाठी मोठी संधी आणते. मात्र, बऱ्याच कडक खरेदी नियमांमुळे ते थेट सरकारी संस्थांना पुरवठा करण्यास अपात्र ठरतात. या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि उपलब्ध असलेल्या डिजिटल प्लॅटफॉर्मचा लाभ घेण्यासाठी, त्यानंतर शासनाने ई-मार्केटप्लेस (जीईएम) पोर्टलचा एक उपाय आणला आहे. विविध सरकारी विभाग / संस्था / पीएसयू यांना आवश्यक असणाऱ्या सामान्य वस्तू व सेवांची ऑनलाइन खरेदी सुलभ करण्यासाठी जीईएम एक वन स्टॉप पोर्टल आहे. सार्वजनिक खरेदीत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि गती वाढविणे हे जीईएमचे उद्दीष्ट आहे. सरकारी वापरकर्त्यांना त्यांच्या पैशाचे सर्वोत्तम मूल्य मिळू शकेल यासाठी हे ई-बिडिंग, रिव्हर्स ई-लिलाव आणि डिमांड एकत्रीकरणाची साधने प्रदान करते.

*सरकारी वापरकर्त्यांनी जीईएममार्फत खरेदी करणे वित्त मंत्रालयाने अधिकृत व अनिवार्य केले आहे.*

## मुख्य वैशिष्ट्ये:

| | |
|---|---|
| **पारदर्शकता** | विक्रेता नोंदणी, ऑर्डर प्लेसमेंट आणि देय प्रक्रियेमध्ये मानवी इंटरफेस बर्याच प्रमाणात दूर करते. खुले व्यासपीठ असल्याने, सरकारसोबत व्यवसाय करू इच्छिणार्या अधिप्रमाणित पुरवठादारांना प्रवेशामध्ये कोणतेही अडथळे नाहीत. खरेदीदार, तिचे/ तिच्या संस्थेचे प्रमुख, देय अधिकारी तसेच विक्रेते यांना प्रत्येक पायरीवर एसएमएस आणि ई-मेल सूचना पाठविल्या जातात. |
| **कार्यक्षमता** | काही मिनिटांच्या कालावधीत आणि संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन, एंड टू एंड इंटिग्रेटेड आणि किंमतीच्या तर्कसंगतीचे मूल्यांकन करण्यासाठी ऑनलाइन साधनांसह थेट खरेदी केली जाऊ शकते. |
| **विश्वसनीय आणि सुरक्षित** | जीईएम संपूर्ण सुरक्षित व्यासपीठ आहे आणि खरेदीदार आणि विक्रेत्यांद्वारे विविध टप्प्यांवर सर्व दस्तऐवजांवर ई-हस्ताक्षर केले जाते. पुरवठादारांविषयी आधीची माहिती एमसीए 21, आधार आणि पॅन डेटाबेसद्वारे ऑनलाइन आणि स्वयंचलितपणे सत्यापित केले केली जाते. याव्यतिरिक्त, सेबीद्वारे समितीत समाविष्ट पत रेटिंग एजन्सींचा पुरवठादारांचे तृतीय-पक्षीय मूल्यांकन करण्यासाठी देखील वापर केला जात आहे. |

## लाभ

| | |
|---|---|
| **खरेदीदारासाठी** | वस्तू / सेवांच्या वैयक्तिक श्रेणीसाठी उत्पादनांची मोठी यादी |
| | शोधा, तुलना करा, निवडा आणि खरेदी करा सुविधा |
| | हवे तेव्हा गरजेनुसार वस्तू व सेवा ऑनलाईन विकत घेता येतात |
| | पारदर्शक आणि खरेदीत सुलभता |
| | निरंतर विक्रेता गुणांकन प्रणाली |
| | खरेदीसाठी आणि पुरवठ्याचे संनियंत्रण करण्यासाठी आणि पेमेंटसाठी युझर-फ्रेंडली डॅशबोर्ड |
| | सुलभ परतावा धोरण |
| **विक्रेत्यासाठी** | सर्व सरकारी विभागांशी थेट संपर्क |
| | कमीत कमी प्रयत्नांत विपणनासाठी वन स्टॉप शॉप |
| | उत्पादने / सेवांवर बोली/रिव्हर्स लिलाव यासाठी वन स्टॉप शॉप |
| | विक्रेत्यांना नवीन उत्पादन सुचवण्याची सुविधा |
| | डायनॅमिक किंमतः बाजारपेठेच्या परिस्थितीनुसार किंमत बदलता येते. |
| | विक्रीसाठी आणि पुरवठ्याचे संनियंत्रण करण्यासाठी आणि पेमेंटसाठी सेलर-फ्रेंडली डॅशबोर्ड |
| | सुसंगत आणि एकसमान खरेदी प्रक्रिया |

# <u>पोर्टल कसे वापरायचे</u>

## खरेदीदारासाठी:

1. जीईएम पोर्टलवर स्वतःची नोंदणी करा
2. गरजेनुसार उत्पादन निवडा आणि कार्ट करा.
3. मागणी तयार करा - मंजूरी आदेश तयार करा - करार तयार करा.
4. ठरलेल्या वितरण तारखेच्या आत ग्राहकाला वस्तू / सेवा वितरित करणे आणि जीईएम पोर्टलवर ऑनलाईन इनव्हॉइस तयार करा.
5. 10 दिवसांच्या आत ग्राहक पावती व स्वीकृती प्रमाणपत्र (सीआरएसी) निर्मिती.
6. खरेदीदाराद्वारे बिल प्रक्रिया (ग्राहकाने सीआरएसीची निर्मिती केल्यावर 2 दिवसात)

## विक्रेत्यासाठी:

1. जीईएम पोर्टलवर स्वतःची नोंदणी करा.
2. तुमची उत्पादने विशिष्ट उत्पादन वर्ग सूचित नोंदवा.
3. एकदा ऑर्डर मिळाली की पोर्टलवर तपशील नोंदवत ग्राहकाला उत्पादन पोहचते करावे.
4. एकदा ऑर्डर यशस्वीपणे पोहचती झाली की ग्राहक त्याच्या कराराच्या वैशिष्ट्यांनुसार उत्पादनाची तपासणी / चाचणी घेईल आणि ऑनलाईन सीआरएसीमार्फत स्वीकृती / नाकारणी जारी करेल.
5. सीआरएसी नंतर, खरेदीदार बिलवर प्रक्रिया करेल आणि कालबद्ध पेमेंटसाठी देय अधिकाऱ्यांकडे पुढे पाठवणे.

### C) MSME मार्ट

जागतिक व्यवसाय ते व्यवसाय (बिझनेस टू बिजनेस - ए2ए) पोर्टल असलेले MSME मार्ट, डिजिटल हस्तक्षेपाच्या माध्यमातून व्यवसाय सेवांचे सुलभीकरण करते. अनेक वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे मार्ट MSMEच्या वस्तू/ सेवा विक्री/खरेदी करण्यास ऑनलाईन मार्केट प्लेस प्रदान करते. हा राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाचा (नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कार्पोरेशन न एनएसआयसी) उपक्रम आहे. या पोर्टलवर अनेक सुविधा आहेत ज्याचा MSME वापर करु शकते, त्यातील मुख्य आहेतः

| | |
|---|---|
| **प्रॉडक्ट जेनेरिक होम पेज** | • खरेदीदार व विक्रेत्यांसाठी स्वतंत्र प्रॉडक्ट जेनेरिक होम पेज विभाग. |
| **उपकरार आदान-प्रदान** | • या माध्यमातून, MSME वितरक आणि/ किंवा फ्रान्चाईझ सुरु करु शकतात. |
| **भंगार खरेदी/ विक्री** | • पोर्टलच्या माध्यमातून MSME इतर MSMEकडून भंगार खरेदी/विक्री करु शकतात. |
| **कच्च्या मालाच्या मागणीचे ऑनलाईन एकत्रिकरण** | • MSME आपल्या कच्च्या मालाची गरज सांगू शकतात जी पुढे उत्पादक/ वितरकांना पाठवली जाते. |
| **प्रदर्शन आणि इव्हेंट्स माहिती** | • सदस्य / गैर-सदस्यांना, राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय MSME प्रदर्शन आणि इव्हेंट्सची माहिती मिळू शकते. |
| **कोटेशन साधनाची विनंती** | • MSME ऑनलाईन ई-कोटेशनसाठी विनंती करु शकते. |
| **सेल्फ-वेब डेव्हलपमेंट टूल** | • MSME स्वतःचे संकेतस्थळ तयार करु शकतात जे इतर समाज-माध्यम व्यासपीठांशी जोडले जाऊ शकते. |
| **जुन्या यंत्रांची खरेदी/ विक्री** | • जुनी यंत्रे MSMEना विकली जाऊ शकतात. |
| **इंटरॅक्टिव्ह डेटाबेस** | • वेगवेगळ्या MSMEचा तपशील या डेटाबेसमधून मिळवला जाऊ शकतो. |
| **राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय निविदा माहिती** | • अनेक फिल्टर्स वापरुन एखादी कंपनी निविदांची माहिती मिळवू शकते. |
| **व्यवसाय लीड्स** | • MSMEला त्यांच्या व्यवसायाच्या प्रमाणात वाढ करण्यासाठी कित्येक लीड्स मिळतील. |
| **हिट्स स्टॅट्स** | • MSME संकेतस्थळाच्या पेजवर युझर भेटींची कल्पना येण्यासाठी. |
| **व्यवसाय सल्ला आणि अहवाल** | • व्यवसायाच्या वाढीसाठी सूचना आणि संबंधित अहवाल प्राप्त केले जाऊ शकतात. |
| **विलीनीकरण आणि अधिग्रहण** | • व्यवसायाचे प्रमाण वाढवण्यासाठी MSME आपल्या विलीनीकरण आणि अधिग्रहणाच्या गरजा सांगू शकते. |
| **मूल्यवर्धन सेवा** | • वैद्यकीय सुविधांसाठी विशेष सूट. |
| **पेमेंट गेटवे** | • पेमेंट गेटवेच्या माध्यमातून सुलभ पेमेंट करुन ऑनलाईन सदस्यत्व. |

## ऑनलाईन मार्केट प्लेस

MSME मार्ट खास MSMEसाठी डिझाइन केलेले आणि विकसित केलेल्या सामान्य ऑनलाइन बाजाराची सुविधा उपलब्ध करुन देते. MSME मार्टच्या फायद्यांचा वापर करताना MSME पोर्टलद्वारे आपली उत्पादने प्रदर्शित आणि विक्री करू शकतात. मार्केटप्लेसची काही वैशिष्ट्ये आहेत:




**स्रोत:** rbi.org.in; vikaspedia.in; psbloansin59minutes.com; udyamimitra.in; india.gov.in; cgtmse.in; npci.org.in; http://www.msmemart.com/

अधिक माहिती मिळवण्यासाठी किंवा या डिजिटल एनेबलर्सचे लाभ घेण्यासाठी कृपया भेट द्या:

PSBLoans; https://www.psbloansin59minutes.com/home
BHIM-UPI https://www.bhimupi.org.in/
RXIL: https://www.rxil.in/
Udyamimitra: https://udyamimitra.in/
CGTMSE: https://www.cgtmse.in/
GeM: https://gem.gov.in/
MSME Mart: http://www.msmemart.com/

### जलद अधिक चांगले आहे

आर्थिक क्षेत्राचे डिजिटायझेशन हे भविष्य आहे. डिजिटल एनेबलर्समुळे फक्त बँकांचेच काम सोपे झाले असे नाही तर MSMEना जलद, विनाअडथळा सेवा मिळण्याची खात्री झाली आहे. या दिवसांत आणि युगात जिथे प्राधान्य, अभिरुची आणि मागण्या पापणी लवल्यावर बदलतात तिथे डिजिटायझेशन पर्यय नव्हे तर गरज आहे. आर्थिक क्षेत्र तसेच MSMEना आपल्या क्षेत्रातील बदलांकडे लक्ष ठेवणे आणि बदलत्या काळानुसार स्वतःला अद्ययावत तसेच श्रेणी सुधारणे महत्त्वाचे आहे. माहिती शृंखलेतील या आवृत्तीत विविध डिजिटल एनेबलर्स आणि त्याच्या वैशिष्ट्यांचा वापर कसा करायचा याविषयी अंतर्दृष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे. आम्हाला आशा आहे की तुम्ही त्यांचा सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्याल आणि तुमचे आयुष्य डिजिटली चांगले आणि अद्ययावत कराल. माहिती शृंखलेतील या खंडाच्या वाचनाचा अनुभव कसा होता आणि पुढे तुम्हाला काय वाचायला आवडेल कृपया आम्हाला कळवा.


### अस्वीकरण

**ही शृंखला इच्छुक / वर्तमान स्वालंबींसाठी काढली आहे. हे विचार किंवा प्रकल्पाचे संपूर्ण स्वरुप भारतीय लघु उद्योग विकास बँकेचे (सिडबी) असेल असे नाही.**

**हा दस्तऐवज मिशन स्वावलंबन अंतर्गत सिडबीच्या संचालनातील एक चांगला उपक्रम आहे. हे प्रामुख्याने अंमलबजावणी केलेल्या भिन्न प्रकल्पांच्या किंवा / स्त्रोतांच्या संकलनावर आधारित आहेत. कोणतीही चूक किंवा माहिती वगळणे टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले असले तरी, कोणत्याही प्रकारे प्रकाशनातील चूक/ माहिती वगळल्यामुळे सिडबी कोणत्याही व्यक्तीला जबाबदार असणार नाही.**